Maayboli.com
मराठी दिवस स्पर्धा

चित्रसंच - ४

किरण गिते
१२ वर्षे
३-४थी (मराठी)
Boston, MA

"अगं नीता! हे बघ, मला पत्र आलं! मला कॅलिफोर्नियाला जावं लागणार आहे," मीरा म्हणाली. "मीटिंग कधी आहे?" नीताने विचारले.
"उद्या!"
"काय? उद्याच?!"
"हो! चल, आपल्यासाठी विमान शोधते." असं म्हणुन, मीरा खोलीबाहेर पळाली.
नीता ओरडली, "आपल्यासाठी? मी तुझ्याबरोबर येऊन काय करू?"
पण ऐकेल ती मीराच कसली? तिच्यापुढे नीताचे काहीच चालत नाही. मीरा आणि नीता ह्या रूममेट्स आहेत. मीरा खूप जोरजोरात बोलते, खूप धिट आणि बडबडी आहे, नीता अगदी शांत आहे. ती जास्त बोलत नाही.
मीराने तिकीटे काढली, आणि पटकन बॅगा भरल्या. दुसऱ्या दिवशी, अगदी पहाटे उठून दोघी विमानतळावर गेल्या. भयंकर थंडी होती आणि बर्फाचे वादळ सुरू होते. प्रवास पाच तासांचा होता, आणि मीरा खूप उत्साहाने जोरजोरात बोलत होती. नीता झोपायचा प्रयत्न करत होती. अचानक, पायलटचा आवाज आला. तो म्हणत होता की विमानात काहीतरी गडबड झाली होती, आणि emergency landing करायला लागणार होते. सगळे प्रवासी घाबरले होते. विमानातल्या सगळ्या फुगणाऱ्या घसरगुंड्या बाहेर आल्या आणि सगळे प्रवासी खाली घसरले. मीराला खूप राग आला होता. आता मी कशी जाणार मीटिंगला? फुग्यात बसून?
नीताने इकडे-तिकडे बघितले.

"चल, आपण फुग्यात बसून जाऊया," ती म्हणाली.
"काय? तुला फुगा कुठे दिसला?" मीराने विचारले, आणि इकडे-तिकडे बघितले. तिकडे जवळच खूप hot air balloon चा उत्सव चालू होता. तिथे शे-दोनशे गरम हवेचे फुगे उडत होते. मोठे फुगे, छोटे फुगे, निळे फुगे, पिवळे फुगे, सगळ्या रंगाचे फुगे.
"चल, एक hot-air balloon भाड्याने घेऊया," नीता म्हणाली. पण गम्मत आहे की मला तो कसा चालवायचा ते अजीबात माहीती नाही. पण आता पर्यंत, मीराला चांगलाच उत्साह आला होता. ती म्हणाली, "काही हरकत नाही. असं किती अवघड असणार?"

पाच मिनिटानंतर, मीरा आणि नीता hot-air balloon मध्ये बसल्या होत्या. नीता भयंकर घाबरलेली होती, आणि सारखा तिचा फोन काढून GPS बघत होती. मीरा पुस्तक वाचून फुगा चालवत होती. थोड्या वेळानी दोघी इतक्या दमल्या, की त्यांना झोप लागली. जाग आल्यावर बघतात तर काय! त्यांचा balloon झाडात अडकलेला! पण सगळ्यात आश्चर्यकारक गोष्ट अशी झाली, की ते झाड मीराच्या अगदी जवळ होते! मीराची भीतिवा मस्त झाली. आणि पुढची कित्येक वर्षे त्या दोघी त्यांच्या ह्या भयंकर धाडसाची आठवण काढून हसत असतात.